CMYK

**सुटीची सूचना**
दैनिक आरंभ मराठीच्या कार्यालयाला आज सुटी असल्याने २६ जुलै रोजी अंक प्रसिद्ध होणार नाही,याची वाचकांनी नोंद घ्यावी.
-संपादक,आरंभ मराठी

दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com



तरुणाईचा सोशल स्फोट 'फॉलोअर्स' वाढले..पण आयुष्याचं काय?
पेज 4

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 164 ■ शुक्रवार, दि. 25 जुलै 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रु 5

# संवाद नव्हे,विसंवाद वाढला: शेतकऱ्यांची समजूत काढताना प्रशासनाची दमछाक

## शक्तीपीठ महामार्गाला विरोध कायम,१९ गावात जाऊन शेतकऱ्यांना राजी करण्याचे आव्हान, संवाद बैठकीतही शेतकरी आक्रमक

आरंभ मराठी | धाराशिव



धाराशिव जिल्ह्यातील १९ गावातून जाणाऱ्या शक्तिपीठ महामार्गाला बाधित शेतकऱ्यांचा मोठा विरोध असून, संतप्त शेतकऱ्यांनी मागील महिन्यात मोजणीसाठी आलेल्या भूमी अभिलेख व महसुल प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना पिटाळून लावले होते. त्यानंतर जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांचा संताप पाहून मोजणीची प्रक्रिया तूर्तास स्थगित केली होती. दरम्यान, १९ गावातील शेतकऱ्यांनी ग्रामसभेचे ठराव घेऊन शक्तीपीठ महामार्ग कायमचा रद्द करावा अशी मागणी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्याकडे केली होती. तुळजापूरचे आमदार राणा पाटील यांनीही बाधित शेतकऱ्यांची एक बैठक घेऊन शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले होते. मात्र, सर्व ठिकाणी शेतकऱ्यांनी शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याची आणि जमीन न देण्याची एकमुखी मागणी केली होती. कृषिदिनाला १ जुलै रोजी शेतकऱ्यांनी राष्ट्रीय महामार्ग रोखून धरत हा विरोध आणखी तीव्र केला होता. आंदोलक शेतकऱ्यांचा रुद्रावतार पाहून शेतकऱ्यांची समजूत काढा, त्यांच्याशी संवाद साधा अशा सूचना राज्य सरकारकडून प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. यासाठी उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख हे मंडळ अधिकारी, तलाठी आणि इतर शासकीय कर्मचाऱ्यांसह गुरुवारी (दि.२४) तुळजापूर तालुक्यातील खुंटेवाडी या गावात गेले होते. गावात सर्व बाधित शेतकऱ्यांसोबत बैठक घेऊन चर्चेतून शेतकऱ्यांचा विरोध कमी करण्यासाठी प्रयत्न केले जात होते. मात्र या बैठकीत शेतकऱ्यांनी शक्तीपीठ महामार्गासाठी एक इंचभरही जमीन आम्ही देणार नाही असा पवित्रा घेतला. यावेळी गावच्या सरपंचांनी आणि इतर बाधित शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली. एसडीएम हे शेतकऱ्यांच्या एकाही प्रश्नाचे उत्तर देऊ शकले नाहीत. शेतकऱ्यांचा आक्रमक पवित्रा पाहून ही संवाद बैठक प्रशासनाला अर्ध्यातच गुंडाळावी लागली. शक्तीपीठ महामार्गासाठी शेतकऱ्यांना राजी करणे प्रशासनाला अवघड जात आहे. यातूनच काही प्रशासकीय अधिकारी शक्तीपीठ महामार्गाचे कुठलेच काम आम्हाला देऊ नका अशी विनंती वरिष्ठांकडे करत आहेत. जिल्ह्यातील शक्तिपीठ महामार्गासाठी जवळपास बाराशे एकर जमीन संपादित करण्यात येणार आहे. या जमीन संपादनामुळे अनेक शेतकरी हे पूर्णपणे भूमिहीन होणार आहेत.

### इंचभरही जमीन न देण्याचा निर्धार

शासनाने कितीही पैसे दिले तरी पैशाला काय चाटायचे आहे का ? जमिनीचा हक्काचा तुकडा गेल्यानंतर लेकरा बाळांचे पालन पोषण कसे करायचे, शक्तिपीठासाठी जात असलेली जमीन ही केवळ जमीन नसून तो आमच्या काळजाचा तुकडा आहे. इंचभरही जमीन आम्ही शक्तिपीठ महामार्गासाठी संपादित होऊ देणार नाही असा निर्धार इथल्या शेतकऱ्यांनी केल्यामुळे प्रशासनासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात लढाईचा निर्धार तीव्र करण्याच्या मानसिकतेत शेतकरी दिसून येत आहेत. शक्तिपीठ महामार्गाचा लढा तीव्र होत असल्यामुळे पोलिस प्रशासनासह जिल्हा प्रशासनापुढेही पेच निर्माण झाला आहे. यामुळे भूमिअभिलेखसह महसूल प्रशासनातील अधिकाऱ्यांचीही दमछाक होणार आहे.

### १९ गावात जाऊन प्रशासन शेतकऱ्यांशी साधणार संवाद

जिल्ह्यातील १९ गावातील बाधित शेतकऱ्यांशी संवाद साधून शेतकऱ्यांना जमीन देण्यासाठी राजी करा असे फर्मान राज्य सरकारने अधिकाऱ्यांना काढले आहे. त्यामुळे प्रत्येक गावात जाऊन शेतकऱ्यांची मनधरणी करणे प्रशासनाला जड जाणार आहे. खुंटेवाडी येथे शेतकऱ्यांनी अनेक प्रश्न प्रशासनाला विचारले, मात्र या प्रश्नांची उत्तरे अधिकाऱ्यांना देता आली नाहीत. मुळात मावेजा किती मिळणार? तो बाजारभावाने मिळणार की, रेडी रेकनर प्रमाणे मिळणार? या प्रश्नांची उत्तरे अधिकाऱ्यांकडे नसल्यामुळे या संवाद बैठकीतून काहीच निष्पन्न होणार नाही.


जिल्ह्यातील साडे सहाशे गटातून आणि पाचशे पेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या शेतातून शक्तीपीठ महामार्ग प्रस्तावित आहे. शासनाने शेतकऱ्यांना जमिनीपोटी मिळणारी मावेजाची रक्कम नेमकी किती असणार आहे, हेदेखील जाहीर केले नसल्यामुळे हा प्रश्न अजून किचकट बनत चालला आहे.

# अल्पवयीन गतिमंद मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमास जन्मठेपेची शिक्षा

आरंभ मराठी | धाराशिव

अल्पवयीन मतिमंद मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या ७० वर्षीय नराधमास धाराशिव येथील कोर्टाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. धाराशिव तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन मतिमंद मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी ७० वर्षीय आरोपी गोरोबा पांडुरंग वाघमारे याला विशेष न्यायालयाने आजन्म कारावास व १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. हा निकाल विशेष न्यायाधीश टी जी मिटकरी यांनी सुनावला. जिल्हा सरकारी वकील ॲड महेंद्र देशमुख व सचिन सुर्यवंशी यांनी सरकारी पक्षाची बाजु भक्कमपणे मांडली. पीडित मुलीची आई काही कामानिमित्त बाहेर गेली असता, आरोपीने अल्पवयीन मुलीवर अत्याचार केला होता. याप्रकरणी पिडीतेच्या आईने बेंबळी पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यावर गुन्हा नोंदवण्यात आला होता. तपासाअंती दाखल करण्यात आलेल्या आरोपपत्रावरून हा खटला विशेष न्यायालयात चालवण्यात आला. सरकार पक्षातर्फे एकूण ९ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. शासकीय अभियोक्ता सचिन सुर्यवंशी यांनी साक्षीदार तपासले तर जिल्हा सरकारी अभियोक्ता महेंद्र देशमुख यांनी प्रभावी युक्तीवाद केला. उपलब्ध साक्षी व पुरावे लक्षात घेता, न्यायालयाने आरोपी गोरोबा पांडुरंग वाघमारे यास दोषी धरत आजन्म कारावास व दंडाची शिक्षा सुनावली.

# अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीसाठी धाराशिव जिल्ह्याला ९ कोटींची मदत



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्ह्यात फेब्रुवारी, मार्च, एप्रिल आणि मे या उन्हाळ्याच्या महिन्यात अवकाळी पाऊस पडल्यामुळे जिल्ह्यातील शेतीचे आणि फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या नुकसानीच्या भरपाईसाठी राज्य सरकारने आता मदत जाहीर केली आहे. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाला आहे. या शासन निर्णयानुसार धाराशिव जिल्ह्यातील ११ हजार २८० शेतकऱ्यांना सदरील नुकसानीपोटी ९ कोटी १ लाख ८५ हजार रुपयांची मदत मिळणार आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना यामुळे काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे. ऐन उन्हाळ्यात पाऊस पडल्यामुळे आंबा, पपई, केळी या फळबागांसह गहू, ज्वारी, हरभरा या रब्बी पिकांचे देखील मोठे नुकसान झाले होते. या अवकाळी पावसाचा फटका जिल्ह्यातील ४ हजार ९८८ हेक्टर क्षेत्राला बसला होता. कृषी विभागाने नुकसानीचे पंचनामे करून अहवाल विभागीय कृषी आयुक्तालयाला सादर केला होता. अवकाळी पावसाच्या नुकसानीबद्दल मराठवाड्याला ६० कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये सर्वाधिक ११ कोटी ५९ लाखांची मदत लातूर जिल्ह्याला जाहीर करण्यात आली आहे. तर त्याखालोखाल धाराशिव जिल्ह्यासाठी ९ कोटींची मदत जाहीर झाली आहे. येणाऱ्या काही दिवसात ही मदत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या थेट खात्यात डीबीटी द्वारे वितरित करण्यात येणार आहे.

# सिमेंट रस्त्याची मधोमध चिरफाड



**धाराशिव-** शहरात गेल्या साडेतीन वर्षांपासून रस्त्यांची वाताहत सुरू आहे. एकीकडे भुयारी गटाराच्या कामासाठी रस्त्यांचे खोदकाम सुरू आहे तर दुसरीकडे नवीन रस्त्यांची कामे ठप्प आहेत. खोदलेल्या रस्त्यांची दुरुस्ती होत नसल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.भुयारी गटार योजनेच्या कामाची कल्पना असूनही नगर पालिकेच्या वतीने ऐन योजनेच्या काळात शहरातील काही भागात सिमेंट रस्त्यावर पैशांची उधळपट्टी केली होती. आता त्याच रस्त्यांची योजनेच्या कामासाठी तोडफोड करण्यात येत आहे. शहरातील शाहू नगर भागात भुयारी गटार योजनेच्या कामासाठी नव्यानेच केलेल्या सिमेंट रस्त्याची मधोमध अशी चिरफाड सुरू आहे. यातून नागरिकांच्या पैशांची कशी विल्हेवाट लावली जाते याचा अंदाज येतो.

# तहसील कार्यालयात आज सस्ती अदालतीचे आयोजन

**धाराशिव-**छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्तांच्या निर्देशानुसार, शेतरस्ते व पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमण त्वरित दूर करून शेतकऱ्यांना जलद न्याय देण्यासाठी ''सस्ती अदालत'' उपक्रम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत प्रत्येक तालुक्यात तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या सस्ती अदालत उपक्रमाअंतर्गत प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी सस्ती अदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे.त्यानुसार आज (दि.२५) सकाळी ११ वाजता तहसिल कार्यालय, धाराशिव येथे सस्ती अदालत भरविण्यात येणार आहे. शेतरस्ते व पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणासंबंधी तक्रारींच्या निपटाऱ्यासाठी ही सस्ती अदालत आयोजित केली जात असून, धाराशिव तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी या बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# तेली समाजाच्या मेळाव्यास प्रतिसाद,गुणवंतांचा मान्यवरांकडून सत्कार

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्हा तेली समाज संघटना व महाराष्ट्र प्रांतिक प्रदेश तैलिक महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय विश्रामगृहात समाज मेळावा व गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.यावेळी माजी खासदार रामदास तडस, भूषण कर्डीले, गजानन शेलार, संजय बापू विभुते, सुनिल चौधरी, जयश बागडे, निलेश सकपाळ, पोपटराव गवळी, अतुल वांदिले, जगदीश वैद्य व धाराशिव जिल्हाध्यक्ष रवि कोरे आळणीकर आदींची उपस्थिती होती.रामदास तडस यांनी सांगितले, ''समाज एकत्र आल्यास सत्ता बदलवण्याची ताकद आपणात आहे. प्रांतिक महासभेच्या पाठपुराव्यामुळेच 'संताजी जगनाडे आर्थिक विकास महामंडळ' स्थापन झाले, ही आपली एकजूट दाखवते.भूषण कर्डीले यांनी आरक्षणासाठी प्रांतिक महासभेच्या लढ्याचा उल्लेख करत, ''समाजासाठी आमचा पक्ष झुंज देईल, ही वचनबद्धता आहे,'' असे ठामपणे सांगितले.कार्यक्रमात १० वी, १२वी उत्तीर्ण व नीटमध्ये यशस्वी ठरलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. त्यात श्लोक राऊत, प्रसाद घोडके, प्रार्थना घेवारे, वैष्णवी सुरवसे, समर्थ डोकडे, जान्हवी कोरे, प्रतीक्षा चिंदे, सुयश राऊत, आदित्य कोरे, प्रणाली उबाळे, प्रणाली उबाळे,भागवत प्रतिक,प्रार्थना गेवारे,ओंकार मेंगले,ओम धारवाडकर,सुरेश राऊत,संतोष शेवते,यश क्षीरसागर,अमृता चाकुरकर,यश राऊत सिध्देश्वर राऊत यांचा समावेश होता.

# १०० आरोग्य शिबिर,१०० जनता दरबार अन् रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न करणार

## भाजपचा पुढील १०० दिवसांचा प्लॅन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित भाजपाचा निर्धार

### आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची माहिती

आरंभ मराठी | धाराशिव

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीने जिल्ह्यात शंभर दिवसांचा लोकपयोगी कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये १०० जनता दरबार, १०० आरोग्य शिबिर तसेच प्रत्येक तहसील कार्यालयाच्या माध्यमातून युवक-युवतींना रोजगार देण्याचा भाजपचा प्रयत्न असणार आहे, अशी माहिती आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी दिली. दरम्यान, यामुळे पुढील शंभर दिवसात जिल्ह्यात भाजपची यंत्रणा अधिक गतिमान होणार आहे.

आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधत भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध उपक्रम साजरे करण्यात आले. यानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात जिल्ह्यातील तब्बल ९१० कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत रक्तदान करुन सामाजिक बांधीलकी जोपासली. हाच वारसा पुढे कायम ठेवत वाढदिवसाच्या निमित्ताने जिल्ह्यात विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील नागरिकांच्या सदृढ आरोग्यासाठी पुढील वर्षभरात तेरणा जनसेवा केंद्राच्या सहकार्याने १०० आरोग्य शिबीरे आयोजित करण्यात येणार आहेत. या माध्यमातून गोरगरीब कुटुंबांतील रुग्णांना मोठा दिलासा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न असणार आहे. मोफत तपासणीसह निःशुल्क उपचार त्यानिमित्ताने जिल्हाभरातील गरजू रुग्णांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. आरोग्य शिबिरात तपासणीदरम्यान आढळून आलेल्या गंभीर आजारांची तातडीने दखल घेऊन मुंबई येथील तज्ञ डॉक्टरांच्या निगराणीखाली शस्त्रक्रिया देखील करण्यात येणार आहेत. आरोग्य शिबिरांसोबतच पुढील शंभर दिवसात तब्बल १०० जनता दरबार जिल्हाभरात आयोजित करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित करण्यात येणाऱ्या या जनता दरबाराची माहिती त्या-त्या वेळी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नागरिकांच्या प्रशासकीय पातळीवरील अडीअडचणींची जागेवर सोडवणूक करण्याचा प्रयत्न या जनता दरबाराच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

### रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न



प्रंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून देवेंद्र यांच्या वाढदिवसानिमित्त २०२२ मध्ये 'आत्मनिर्भर भारत, आत्मनिर्भर धाराशिव' हा उपक्रम आपण सुरु केला होता. या अंतर्गत रोजगार निर्मीती योजनांच्या माध्यमातून कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी सहकार्य करण्यात येते. सदर योजना युवक युवतींसाठी अत्यंत उपयुक्त ठरत असून, कर्जाच्या एकूण रकमेत महिलांना ३५ टक्के व पुरुषांना २५ टक्के अनुदानही मिळते. या माध्यमातून हजारो युवक युवतींनी बँकेकडून कर्ज प्राप्त करून स्वत:चा नवा व्यवसाय सुरु केला आहे किंवा चालू व्यवसायात लक्षवेधी वाढ केली आहे. त्यामुळे या उपक्रमामध्ये आणखी युवक युवतींना सहभागी करुन घेण्याच्या अनुषंगाने पुन्हा एकदा जिल्ह्यातील प्रत्येक तहसील कार्यालयात रोजगार निर्मिती योजनेंतर्गत नोंदणी शिबीर आयोजित करण्यात येणार आहेत.

**राणाजगजितसिंहपाटील,**
आमदार,

# किसान सन्मान निधी आणि नमो शेतकरी योजनेच्या हप्त्याची शेतकऱ्यांना प्रतीक्षा

## पाच महिने झाले तरी लाभार्थ्यांना हप्ता नाही

आरंभ मराठी | धाराशिव

शेतकऱ्यांच्या सन्मानासाठी केंद्र आणि राज्य सरकारने सुरू केलेल्या किसान सन्मान निधी आणि नमो शेतकरी सन्मान निधी या दोन्ही योजनांच्या हप्त्याची शेतकरी प्रतीक्षा करत आहेत. शेतकरी जे मागतो, ते सरकार देत नाही आणि जे मागितले नाही ते देण्याचा प्रयत्न करते. अशा शब्दांत शेतकरी सध्या आपल्या भावना व्यक्त करत आहेत. केंद्र आणि राज्य सरकारने सुरु केलेल्या पीएम किसान निधी आणि 'नमो शेतकरी योजने'चे पैसे नेमके कधी मिळणार हे शासनाकडून स्पष्ट करण्यात आलेले नाही. त्यामुळे या योजना सुरू आहेत की बंद झाल्या असा प्रश्न शेतकरी विचारत आहेत. केंद्र सरकारने सुरु केलेल्या पीएम किसान सन्मान निधी या योजनेचे आतापर्यंत १९ हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आलेले आहेत. तर राज्य सरकारने सुरु केलेल्या नमो शेतकरी महासन्मान निधी या योजनेचे ६ हप्ते जमा केले आहेत. या दोन्हीही योजनेतून शेतकऱ्यांना दर चार महिन्याला दोन हजार रुपये असे वर्षाला ६००० रुपये शेतकऱ्यांना दिले जातात. केंद्राच्या पीएम किसान योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्र सरकारने देखील नमो शेतकरी महासन्मान निधी या नावाने योजना सुरु केली आहे. दर चार महिन्याला या योजनेचे पैसे वितरित करणे अपेक्षित आहे. मात्र, पाच महिने झाले तरी केंद्र आणि राज्य सरकारने या योजनांचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा न केल्याने शेतकरी संताप व्यक्त करत आहेत. यापूर्वी पीएम किसान सन्मान निधीचा २००० रुपयांचा १९ वा हप्ता केंद्र सरकारने २४ फेब्रुवारी २०२५ रोजी दिला होता. तर नमो महासन्मान निधीचा ६ वा हप्ता मार्च २०२५ मध्ये जमा केला होता. दोन्ही हप्ते जमा करून चार महिने होऊन गेले. मात्र, अजूनही पुढचा हप्ता केंव्हा वितरित होणार याबद्दल शासनाकडून काहीही स्पष्ट केले नाही. धाराशिव जिल्ह्यात तब्बल दीड महिना पावसाने ओढ दिल्याने काही भागात दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांसमोर उभे राहिले होते. शेतकऱ्यांना सध्या पैशाची गरज असताना केंद्र आणि राज्य दोन्हीही सरकारकडून शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग होत असल्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.

### १५००० रुपयांचे आश्वासन हवेत विरले

महायुतीने त्यांच्या जाहीरनाम्यात नमो आणि पीएम किसान सन्मान निधीची रक्कम वाढवण्याचे आश्वासन विधानसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात दिले होते. सध्या या दोन्ही योजनेतून लाभार्थी शेतकऱ्यांना वर्षाला १२००० रुपयांची मदत मिळते. ही मदत वाढवून १५००० रुपये करण्याचे आश्वासन महायुतीने दिले होते. मात्र, या आश्वासनाची पूर्तता केलेली नाही. लाडकी बहीण योजनेचे पैसे १५०० वरून २१०० रुपये करण्याचे आश्वासन दिले होते, पण ते पूर्ण केले नाही. त्याच पद्धतीने शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन देखील शासनाने पूर्ण केले नाही.

### शेतकऱ्यांना गरज असताना पैसे मिळत नाहीत

राज्य आणि केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी ज्या योजना सुरु केल्या, त्या योजनांचे पैसे वेळेत मिळाले तरच त्याचा विनियोग योग्य पध्दतीने होईल. परंतु, सरकार पाच महिने झाले तरी योजनेचे पैसे देत नसल्यामुळे शेतकरी हतबल झाल्याचे चित्र दिसत आहे. नमो शेतकरी सन्मान निधीची रक्कम वाढविण्याचे आश्वासन देखील खोटे ठरले आहे. शासनाने आहे ते पैसे तरी शेतकऱ्यांना वेळेत द्यावेत.

**अनिल जगताप**
शेतकरी नेते.

CMYK

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

संपादकीय

शुक्रवार, दि. 25 जुलै 2025

# सतत चालते ती, तिची वाट आहे..तरी लागतो का सतत घाट आहे

आरंभ मराठीच्यारसिक वाचकांना सादर नमस्कार. आज काव्यारंभचे पंचविसावे पुष्प! हे पुष्प मी गुंफणार आहे,
सौ. अनिता नंदकुमार पडवळ यांच्या सुंदर गझल आणि कवितांनी ! त्यांचे
शिक्षण बी.ए. डीएड . झालेले आहे. त्या राष्ट्रभाषा पंडित परीक्षा उत्तिर्ण आहेत.
मराठी कन्या प्राथमिक शाळा , येथे त्या सहाशिक्षिका आहेत.
वाचन , लेखनाची त्यांना आवड आहे. ९३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात त्यांचा निशिगंध हा पहिला कविता संग्रह प्रकाशित झाला आहे, तसेच 'दरवळ ' हा प्रातिनिधिक कविता संग्रह प्रकाशित झाला आहे.
'सावित्रीच्या कविता' ह्या प्रातिनिधिक कविता संगहात कविता लेखन केले आहे.
* ९३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन , पूर्वतयारीच्या पार्श्वभूमीवर 'काव्य शारदा 'शारदोत्सव कवितेचा या कविसंमेलनात सहभाग दिला आहे.
९३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन धाराशिव . 'कवी कट्टा 'या काव्य मंचावर कविता सादरीकरण केलेले आहे.
कलाविष्कार अकादमी धाराशिवच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'श्वासगझल मुशायरा 'गझल सादरीकरण केले* अक्षरवेल महिला साहित्य मंडळ धाराशिवच्या त्या सदस्य आहेत.
*गझल मंथन साहित्य संस्थेत आजीवन सभासदआहेत.
अंकुर दिवाळी अंकात लेख ,
कविता , निबंध, लेखन ,चारोळ्या , शेलचारोळी , अभंगरचना , चाराक्षरी काव्य , घाईकथा ,दर्पण काव्य , छाया दर्पणकाव्य इत्यादी विविध प्रकारांचे त्यांनी लेखन केलेले आहे.
*' अंकुर 'दिनदर्शिकेत साहित्य प्रकाशित आहे.
* जागतिक महिला दिनानिमित्त पु .ना. गाडगीळ तर्फे साहित्य कार्याबददल सम्मान,
*विशाखा संमेलन,तसेच
* मराठवाडा साहित्य परिषद,
अखिल भारतीय महिला गझल संमेलन पणे सहभाग



डॉ. रेखा अनिल ढगे

काव्यारंभ

सन्माचिन्ह देऊन गौरविले आहे. 'सार्थक ' स्मरणिकेत 'मराठवाडा मुक्ती संग्राम ' या विषयावरील त्यांचा लेख प्रकाशित आहेत. तसेच
स्वामी रामानंद तीर्थ पुरस्कार, औरंगाबाद विभागातर्फे 'क्राईस्ट इंटरनॅशनल ' पुरस्कार .
औरंगाबाद विभागातर्फे, 'मराठवाडा गुणवंत शिक्षार्थी ' पुरस्कार प्रदान,
२०२१ सभा ने स्वामी रामानंदतीर्थ पारितोषिक व औरंगाबाद विभागातर्फे
डी. एम . पी. इंडस्ट्रिज पुरस्कार,
स्व . रविश्चंद्र दीक्षित
पितृस्मृति पुरस्कार,इत्यादी अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहेत. तसेच
२०२३ मधे समता सेवाभावी शिक्षण प्रसारक मंडळ , धाराशिव संचलित
मराठी कन्या प्राथमिक शाळा, धाराशिव – *शिक्षक पुरस्काराने *सन्मानित केलेले आहे.
अशा या गुणी कवयित्री वगझल कारा अनिता पडवळ यांच्या कविता व गझल पण तशाच वेगवेगळ्या विषयांवर आहेत.
त्यांचे वडिल मराठवाडा मुक्तीसंग्रामात होते, त्यामुळे त्यांनी मुक्ती संग्रामातील त्यागाच्या, बलिदानाच्या कथा प्रत्यक्ष ऐकल्या आहेत, त्यातूनच त्यांची धगधगते यज्ञकुंड ही कविता त्यांनी लिहिली आहे..,
त्या लिहितात,
मराठवाडा मुक्ती संग्रामाची यशोगाथा
शाश्वत, ज्वलंत खरी हो ही मुक्ती गाथा
वीर, वीरांगनानी निढळ्या छातीने
लढलेल्या पराक्रमाची महान कथा !
आपल्या आईने दिलेल्या संस्काराबद्दल त्या म्हणतात,

मायेचा निरंतर झरा असणारी
संस्काराची शिदोरी देणारी,
खऱ्या अर्थाने जीवन जगणारी, माझी माय!
तर प्रेम या कवितेत त्या म्हणतात
प्रेम कशावर करावे
सावित्रीच्या धाडसावर,
शाहुमहाराजांच्या विचारांवर,
आपल्या मातृभुमीवर !
तर आपल्या गझलेत स्त्रियांना
येणाऱ्या अडचणीविषयी वास्तव शेर त्यांनी लिहिलाय,
सरळ चालते ती तिची वाट आहे
तरी लागतो का सतत घाट आहे
तर आपली गझल कशी असावी हे वर्णन करणाऱ्या एका शेरात म्हणतात,
काळजाला जराशी भिडावी गझल
आसवांची फुले ही बनावी गझल

तर माझी मराठी या कवितेत
त्यांनी मराठीची महती वर्णन केली आहे,
गंगेसमान पावन, पवित्र
माझी माय मराठी
शुरवीरांच्या इतिहासाची
साक्ष माझी माय मराठी!
अशा या माता, पिता, माय मराठी,
देशप्रेमाने भारलेल्या कविता व गझलांचा आपण रसास्वाद घेऊया.

## माय

मायेचा निरंतर झरा असणारी
सतत कष्ट करणारी
सुख –दुःखात साथ देणारी
वेळप्रसंगी कठोर होणारी
संस्काराची शिदोरी देणारी
संधीचे सोनं करणारी
संकटांना धैर्याने सामोरे जाणारी
विज्ञानाबरोबरअध्यात्म
ाचीआवडअसणारी
सण –उत्सव आनंदाने साजरी
करणारी
सत्य ,कर्म श्रेष्ठ आहे अशी
सांगणारी
गोरगरिबांची कनवाळू ,अंधश्रद्धा
न मानणारी
शिक्षणाची अतोनात आवड
असणारी
कोणत्याही कार्यात झोकून देणारी
माणसात देव शोधणारी
अन्यायाविरुद्ध वाचा फोडणारी
विविध कलेत निपुण असणारी
खऱ्याअर्थाने जीवनजगणारी
माझीमाय

## धगधगते यज्ञकुंड

मराठवाडा भूमी ही संत महतांची
वीर हुतात्म्यांची
या पावन, पवित्र भूमीसाठी
शूरवीरांनी आहुती दिली प्राणांची

मराठवाडा मुक्त झाला
रझाकाराच्या जोखडातुनी
ही रक्तरंजित क्रांती
लढली सर्वसामान्यांनी

इथल्या ज्वाला गेल्या आसमंतात
नागरिकांनी केला प्रतिकार सत्तेला
केले सळो की पळो
भूमिगत राहून जुलमी सरकारला

अनेक भूमीपुत्रांच्या त्यागाने
लढू लागली जनता निखराने
खूप भारावलेली
माणसे ही देशप्रेमाने

जगाच्या इतिहासात
नाही झाले हो असे रणसंग्राम
लढाई होती अन्यायी राजवटीविरोधी
केला नसे असा कोणी पराक्रम
मराठवाडा मुक्तिसंग्रामाची यशोगाथा
शाश्वत, ज्वलंत खरी हो ही
मुक्तिगाथा
वीर , वीरांगनानी निढळ्या छातीने
लढलेल्या पराक्रमाची महानकथा

हैदराबाद संस्थान झालेभारतात
विलीन
होते लोकांच्या बलिदानाचे स्मरण
या धगधगत्या यज्ञकुंडाचे
नाही होणारहोविस्मरण...

## प्रेम

प्रेम कशावर करावे
भगतसिंगाच्या देशभक्तीवर
विवेकानंदाच्या तत्त्वज्ञानावर
भरताच्या बंधुप्रेमावर

प्रेम कशावर करावे
शिवबांच्या संघटनावर
रमाईच्या कष्टावर
जिजाऊच्या कणखरपणावर

प्रेम कशावर करावे
फुलातील मकरंदावर
देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या
राष्ट्रभक्तीवर
उन्हातान्हात राबणाऱ्या श्रमावर

प्रेम कशावर करावे
सावित्रीच्या धाडसावर
शाहुमहाराजांच्या विचारांवर
आपल्या मातृभूमीवर

प्रेम कशावर करावे
शबरीच्या स्वामी निष्ठेवर
उर्मिलेच्या त्यागावर
काळ्या आईवर

प्रेम कशावर करावे
माणसातील माणुसकीवर
सागराच्या अथांगतेवर
चंद्राच्याशीतलतेवर

## गझल

काळजाला जराशी भिडावी गझल
आसवांची फुले ही बनावी गझल

आज दुःखास बिलगुन बघावे जरा
सोबतीला सुखाच्या रहावी गझल

वेदनेला नसे अंत माझ्या जरी
आज हर्षास माझ्या कळावी
गझल
अंतरंगी जखम होत गेली जरी
त्यास लावून अत्तर फुलावी गझल
सांगते मी कधीची तुला श्रावणा
स्वागताला तुझ्याहीसुचावीगझल

## माझी मराठी

भास्करा समान तेज जिच्या
अंगी ती माझी माय मराठी

माऊलीची ऊबदार छाया
देणारी माझी माय मराठी

अमृताहूनी मधुर, रसाळ
अशी माझी माय मराठी

अभंग, कविता ,ओव्यामधुनी
गुणगुणते माझी माय मराठी

संत महात्म्यांच्या वचनातून संदेश
बोधपर देते माझी माय मराठी

सातासमुद्रापार घेते भरारी
माझी माय मराठी

शिवछत्रपतींच्या समशेरीची
धार तशी माझी माय मराठी

सनईचे सूर जशी बासरीची धून
आहे माझी माय मराठी

बळीराजांच्या कष्टांचे मोल
सांगते माझी माय मराठी
सागराच्या अथांगतेचे
गीत गाते माझी माय मराठी

चंद्राच्या शीतलतेत अव्याहत
वाहणारी माझी माय मराठी
पोवाडा , लावणीची शानच
सारी माझी माय मराठी
गंगेसमान पावन , पवित्र
माझी माय मराठी
शूरवीरांच्या इतिहासाची



सौ. अनिता नंदकुमार पडवळ
धाराशिव.

# सणांचा राजा श्रावण महिना



उद्या पासून सुरू होणारा श्रावण मास हिंदू धर्मातील पवित्र महिना श्रावण, पावसाळा सुरू झाला की,अनेकजण विशेषतः महिला या श्रावण महिन्याची आतूरतेने वाट पाहतात.मराठी श्रावण म्हटलं की,सर्व सणांचा राजा मानला जातो.श्रावण महिन्याचे आपल्याकडे विशेष महत्व आहे.पावसाळा ऋतू मध्ये येणारा हा श्रावण सण प्रत्येकाला हवाहवासा असतो.श्रावण महिन्यात अनेक सण असतात. श्रावणातील पावसाचे वैशिष्ट्य म्हणजे क्षणात पाऊस आणि क्षणात ऊन दिसून येते.अशा या मनाला उभारी आणणाऱ्या श्रावण महिन्याचे महत्त्व आहे.श्रावण महिन्यातील सण मात्र या संपूर्ण महिन्यात अगदी हौशेने साजरे केले जातात. आपल्याकडे निसर्ग आणि परंपरा या दोन्ही दृष्टिने श्रावण महिन्याचे महत्त्व आहे.चातुर्मासातील सर्वात श्रेष्ठ महिना म्हणून याची ओळख आहे. आषाढी अमावस्येला दिव्याची आवस केल्यानंतर सर्व व्रत वैकल्यांना सुरूवात होते. यानंतर निसर्गातील वातावरणही बदलते आणि रसरशीत भाज्यांचा महिना सुरू होतो.श्रावण महिना हा उत्सवाचा महिना म्हणून ओळखला जातो आणि म्हणूनच याला राजा श्रावण असे म्हणतात. कारण बरेच मराठी सण या महिन्यात असतात. विशेषतः महिलांसाठी हा महिना खास असून नवविवाहांसाठी तर माहेरी जाण्याची जणू पर्वणीच असते. श्रावण महिना म्हटलं की,डोळ्यासमोर येतं ते अत्यंत निर्मळ असं वातावरण आणि शिव भक्तांसाठी उत्साहाचा महिना,महादेवांना प्रिय असणाऱ्या या श्रावण महिन्याला हिंदू धर्मात विषेश महत्त्व आहे.श्रावणी सोमवार पासून ते अगदी श्रावणी अमावस्येपर्यत अनेक सण असतात. त्यामुळेयाला सणांचा राजा म्हटलं तर ते अतिशयोक्ती ठरत नाही.श्रावण महिन्याचे महत्त्व नक्की काय आहे ? श्रावण सुरू होतो तेव्हापासून सुरू होणाऱ्या व्रतवैकल्यांना महत्त्व आहे.भगवान शंकराला हा महिना खूपच प्रिय आहे.या महिन्यात करण्यात येणाऱ्या व्रतांमुळे वातावरण पवित्र होते आणि आपल्याला आपल्या पापांपासून मुक्तता मिळते असा समज आहे.त्यामुळे या काळात महादेवाची पुजा हीफलदायी ठरते.महादेवाची मनोभावे पूजा अर्चा केल्याने आपल्या इच्छा,आकांक्षा पूर्ण होतात असंहीम्हटलं जातं.तसेच श्रावणातील या सणांमुळे आप आपसांतील संबंध दृढ होतात. सर्वत्र आनंद, उत्साह आणि जल्लोषात साजरा केला जाणारा श्रावण महिना आहे.म्हणूनच याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.याशिवाय पुराणात सांगितल्याप्रमाणे देवी सतीचा दुसरा जन्म म्हणजे पार्वती मातेने आपले दैवत शिवशंकर अर्थात भगवान महादेव यानां प्रसन्न करण्या साठी श्रावण महिन्यात कठोर व्रत वैकल्ये केली आणि उपवास ,साधनेने भगवान शंकरास प्रसन्न करून घेतले होते.त्यांच्या या कडक व्रतामुळे भगवान महादेव प्रसन्न झाले.आणि देवी पार्वतीशी विवाह केला होता.त्यामुळे धार्मिक दृष्टीने श्रावण महिन्याचे महत्त्व अधिक आहे. श्रद्धेनुसार असे मानण्यात येते की,प्रत्येक वर्षी या महिन्यात भगवान महादेव हे आपल्या सासरी जात असत आणि त्यावेळी भक्तांना त्यांची कृपा प्राप्त करण्याची संधीच मिळत असे.त्याच काळात शिवशंकर पृथ्वीवर येतात असाही समज आहे आणि म्हणूनच शिवशंकराला प्रसन्न करून घेण्यासाठीच श्रावण महिना नेहमी साजरा करण्यात येतो.हा सर्वाधिक पवित्र महिना समजण्यात येतो.तसेच देवी पार्वती यांनी या महिन्यात युवावस्थेत असताना केवळशहरांना प्रसन्न करून घेण्यासाठीच कठोर उपवास केला आणि त्यांच्या या कठोर तपस्येला या महिन्यात शिवशंकर यांनी फळ दिले अशी अख्यियिका आहे.म्हणूनच या महिन्यात करण्यात येणाऱ्या तपस्येचे चांगले फळ मिळते.असा हा पवित्र श्रावण महिना आहे.श्रावण महिन्याच्या खूप खूप शुभेच्छा ......!



सोमनाथ बेलुरे, धाराशिव

## झाडांच्या छायेखाली

निष्पाप निरागस असतात झाडं
अगदी लहान बाळांसारखी
पूर्ण वाढ झालेली डेरेदार झाडं
देतात गडद थंड सावली
फुलांनी मोहरलेली सुंदर झाडे
हवेत सुगंध पसरवतात
फळांनी बहरलेली नम्र झाडे
फांद्या जमिनीकडे झुकवतात
झाडे पृथ्वीचा जीव आणि प्राण
विषारी वायू शोषून घेतात
प्राण्यांना जीवंत ठेवण्यासाठी
प्राणवायूचा पुरवठा करतात
रखरखीत असाह्य उन्हाळ्यात
माणसे झाडाखाली विसावतात
निर्जीव वाहने गरम होऊ नयेत
म्हणून सावलीत उभे करतात
झाडांच्या फळांचा व सावलीचा
पुरेपूर फायदा माणसाने घेतला
स्वतःच्या स्वार्थासाठी त्याने
झाडांवर कुऱ्हाडीचा घाव घातला
निर्दयी निष्ठूर क्रूर माणूस
उपकारांची जाणीव नाही ठेवत
रस्त्यांचे रुंदीकरण करताना
झाडांना जीवंत नाही सोडत
स्वार्थी माणसाच्या भल्यासाठी
झाडांनी बलिदान दिले आहे
गडद थंड स्वतःच्या छायेखाली
दुष्ट माणसाला आश्रय दिला आहे




बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.
मो.९५४५४४२६४८.

# सकारात्मक साहित्यिक मूल्यांचा ठेवा: थोडंस कडू आणि खूपच गोड

बचेंगे तो और भी लढेंगे ''हे विधान लेखकाच्या संपूर्ण जीवनपटाशी साधर्म्य साधणारे असून,त्याचा प्रत्यय पुस्तक वाचताना वाचकास येतो. इतके साहस मनी ठेवून प्राप्त परिस्थिती आनंदाने स्वीकारणारे लेखक म्हणजे ,सोलापूर येथील निष्णात सर्जन डॉ अनिकेत देशपांडे होय ..

सकारात्मकता,आनंद,श्रावणातील हिरवळ, दाटून आलेले नभ,तृण पात्यांची मखमल,फुलांचे बहर,हे त्यांच्या जगण्याचे प्रतीक व बलस्थान आहेत.जीवनातील संघर्षाला,वेदनेला,कारुण्याला आनंदाची झालर दिली,जीवनात चढ–उतार दोन्ही हळुवार पावलाने यायचे.पण त्याचा समतोल साधत, काटेकोरपणे व निर्भयपणे अंगीकृत करण्याची कला लेखक डॉ अनिकेत देशपांडे यांनी आत्मसात केली.जीवनात थोडे कडू होते ,पण त्याचे सुद्धा रुपांतरण गोडातच केले. आणि हेच कडू, गोड जीवनाचे अनुभव पुस्तकात आविष्कृत झाले आहेत.लेखकाने साहित्य लेखनात जगण्याचे मुल्य सर्वोच्च मानले.अशा साहित्यिक मूल्यांची रुजवण म्हणजे''थोडंस कडू आणि फारच गोड'' ही साहित्य कलाकृती आहे. डॉ अनिकेत देशपांडे यांचे वडील डॉक्टर व आई आयुर्वेदिक कॉलेजला संस्कृतच्या प्राध्यापिका होत्या.आईला संगीताची आवड आवाजात विलक्षण गोडवा ,त्यामुळे संगीताचे,गाण्याचे संस्कार,बालमनावर रुजले.सर्व बहीण भावंडात लेखकाची जडणघडण झाली .मात्र हे करताना अभ्यासाची जिद्द,चिकाटी मनात धरून एम.एस .व्हायचे आणि मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल चालू करायचे ,हा मनीचा निग्रह होता.पण प्रयत्नाला यशाची जोड म्हणतातच ती प्राप्त झाली. या सर्व वाटेवर त्यांच्या आई वडिलांचा आशीर्वाद आणि विवाहानंतर त्यांची पत्नी अनिता हिची सावलीप्रमाणे साथ त्यामुळे जीवन अधिकच वैभवसंपन्न व समृद्धीशाली झाले.लेखकाची नजर अत्यंत पारदर्शक असून जगण्याचा रंगोत्सव साजरा करणारा कवी त्यामुळे क्लासमध्ये मैत्रीची लागलेली ओढ,नेत्रांना सुखावणारे भास ,आभासाचे चित्र मन:पटलावर उमटत होते.जगण्याचा आनंद द्विगुणित वाटत होता.तोच आनंद पुढे आयुष्याची जीवनरेखा झाली.मेडिकलला प्रवेश घेतला ,काही गोष्टी ,व्यसन सवयीच्या गुलाम बनल्या. जीवनी बऱ्याच वेळा श्रावण फुलला.कधी निराशेची पानगळ झाली.आईच्या आजारपणाने लेखकाचे मन गलबलून गेले. कारण आई म्हणजे विश्व,प्रेमाचा सागर असतो .हेच खरे पण काय सारीच परीक्षा,आजीचं जाणं. हे सर्व मनात कोलाहल निर्माण करणारे होते .जीवनात कधी,कधी अनेक संकट फेर धरू लागतात.पण स्वीकरून परिस्थितीप्रमाणे निर्णयक्षम होता आले पाहिजे.हा विचार लेखक अनिकेत देशपांडे यांनी रेखांकित केले आहे.डॉक्टर झाल्यावर एक समोर दृश्य दिसायचे . ऑपरेशनला रुग्णास नेताना त्यांची व्याकुळ नजर आणि ऑपरेशन यशस्वी झाल्यावर त्यांची कृतज्ञतेची हसरी




लकेर ,याचे एक आत्मिक समाधान डॉ ना देखील असते. तरी वैद्यकीय क्षेत्रात कार्य करताना फार भावनिक होऊन चालत नाही.तटस्थता असावी लागते.हा अनुमान आविष्कृत केला आहे.शुगर डिटेक्ट झाल्यामुळे गोडवा निर्माण झाला. परंतु त्यामुळे अनंत अडचणी येत राहिल्या.औषधासाठी मुंबईला जावे लागायचे,आर्थिक बाजूचे गणित पहावे लागायचे .मधुमेहाचे प्रॉब्लेम फार सतावत होते.पण उपचार महत्वाचे असतात.पण ''कोरड्या मनाचा देखावा करावा लागला.'' हे पुस्तकातील वाक्य अधोरेखित करावे असे आहे.नॉनमेडिको असणाऱ्या व्यक्ती आजाराविषयी अनभिज्ञ असतात'' अज्ञानात सुख असते '' पण डॉ असल्यामुळे सर्व काही ज्ञात नसते .ही प्रगल्भ विचारसरणी प्रतीत होताना दिसते. म्हणून लेखक म्हणतात एकदम काळजी न करता काळजीने रहाणे महत्वाचे असते. तरी सुद्धा व्यायाम,आहार ,खेळ सर्व नियमित चालू होते तरीपण ..हा गोडवा आला कसा?'' हा प्रश्न?त्यांना पडतो .पण अशा बिकट मार्गावरून जाताना अनेक डॉ सहकारी मित्रांनी संकटावर कशी मात करायची सांगितले. व इतरही सहकारी आणि अनेक दृष्य ,अदृष्य स्वरूपाच्या हाताचे जीवनात मौलिक योगदान लाभले .ते दिलासा देणारे शब्द किती आयुष्य वाढवणारे ठरतात याची प्रचिती आली.म्हणून लेखक त्यांची उतराई न करता ऋणात राहू इच्छितात.ही कृतार्थता जीवनात सफलदायी वाटते. पण एम .एस झाल्यानंतर झालेला आनंद हा साखरेपेक्षाही गोड होता. प्रगतीचा आलेख उंचावत होता .तसा कधी उदासीनतेचा आलेख खालीही यायचा पण महत्वाकांक्षी असल्यावर नियती ही शरण येते असे म्हणतात त्याचप्रमाणे डॉ देशपांडे यांची दिनक्रमा चाललेली होती.पुढे सिद्धेश्वर कॅन्सर हॉस्पिटलमध्ये असिस्टंट ऑनररी म्हणून नेमणूक झाली.कामाचा वेग वाढत गेला. मनात शुगरची भीती होतीं पण तेथील डॉक्टर मंडळींनी दिलेला दिलासा अत्यंत मौल्यवान आहे.सर्व ऑपरेशन छान होऊ लागले. आत्मविश्वास जागृत झाला. व्हील चेअरवर आलेले डॉ अडवाणी यांना पाहून स्वतः लेखक अंतर्मुख झाले. कारण इतक्या परिस्थितीतही डॉ किती कार्यप्रवण असतात याचे एक उदा: म्हणजे डॉ अडवाणी होय .अशा माध्यमातून माणूस खुप काही शिकुन जातो हे सकारात्मक घटना,प्रसंगा चे चित्रण लेखकाने प्रकर्षाने शब्दांकित केले आहे.डॉ देशपांडे यांचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे कर्मकांडावर विश्वास ठेवत नाहीत. तर माणसात देवत्व शोधतात .हे त्यांच्या स्वभावाचा वेगळा पैलू वाचकाला चिंतन करावयास लावतो. लेखकाने जीवनात खूप मेहनत,परिश्रम घेतले आजाराशी दिलेली झुंज म्हणजे समाजाला दिलेली एक प्रेरणा असून, वाचकाचे आत्मबळ वाढवणारी आहे. आत्मविश्वास कधी ढळू द्यायचा नसतो. मनाची उभारी अतिशय महत्वाची आहे.ती ज्याची त्याने घ्यायची असते.हे प्रत्येक मानवी मनाने स्वतःमध्ये परिवर्तन करायचे असते हे भाव प्रतिपादित केले आहेत.हॉस्पिटलसाठी येणाऱ्या अडचणी,ट्रीपला गेल्यानंतर अचानक होणारा शुगरचा त्रास,हे सर्व जरी घडत असले तरी त्यावर त्वरित उपाय करून ,वेळेवर तपासण्या करून घेणे व ''घडून न घडल्यासारखे परत पूर्ववत कामाला सुरूवात करणे ''हा सूचित केलेला संयुक्तिक विचार अत्यंत मौलिक आहे.परंतु लागलेले व्यसन शरीराला हानिकारक असते हे नक्की .मात्र कधी कोणती चूक झाली त्याबद्दल डॉ प्रांजळपणे कबुलीही देतात .कधी आयुष्यात आनंदाची भरती आली की पुन्हा कोणत्या तरी कारणाने ओहोटी असतेच पण लेखकाने प्रवाहाच्या विरुद्ध पोहून आशावादी स्वप्नांचा किनारा गाठण्याचे ध्येय निश्चितच केले होते.हा विवेक मूल्यांचा विचार संक्रमित केला आहे. लेखक डॉ देशपांडे यांनी पुस्तकाच्या पाठीमागील भागात अत्यंत उपयुक्त अशी माहिती प्रतिध्वनित केली आहे .इन्शुलिनविषयी जागरूक असणे किती गरजेचे आहे ते नमूद करताना व्यक्त होतात .की रुग्णांचे मन नानाविध प्रश्नांनी गोंधळलेले असते .गोळी चांगली की इन्शुलिन चांगले .परंतु असे काही नसते. प्रत्येक व्यक्तीच्या प्रकुर्ती वर अवलंबून आहे.पेशंट नी सर्वतोपरी डॉक्टरांच्यावर सोपऊन,पुर्णतः विश्वास ठेवावा .साखरेचे प्रमाण कमी जास्त वाटले तर त्वरित डॉ ना भेटून सल्ला घ्यावा .आपण मेडिकल मधील घेतलेली गोळी त्याची पॉवर ,त्याची तारीख, काळजीपूर्वक बघून घ्यावी .काळजी करण्यापेक्षा काळजी घेणे म्हत्वाचाचे आहे.शुगर असणाऱ्यांनी सोबत ग्लुकोमिटर ,बिस्कीटपुडा ठेवावा .म्हणून हे पुस्तक शुगर च्या लोकांसाठी उपयुक्त तर आहेच पण इतरांनी व असंख्य वाचकाने वाचावे असे आहे. लेखक डॉ देशपांडे हे पॉझिटिव्ह विचार प्रकट करताना म्हणतात की,त्यांना या आजाराने शिस्तबद्ध जीवन दिलं, जबाबदारीची जाणिव करून दिली.संपूर्ण कुटुंबाचा आरोग्य विमा करणे किती महत्वाचे असते हे ही शिकवले.खर्च आटोक्यात ठेवून पैशांची बचत कशी करायची याचे ज्ञान दिले. व प्रत्येक माणसाला समजून कसे घ्यायचे हे शिकवले.हा फार महत्वाचा विचार आलेखित केला आहे.आजाराचे कारण सांगून त्यांनी स्वतःची प्राथमिक जबाबदारी कधी टाळली नाही. तर ते पुन्हा नव्या जोमाने कृतीशील कर्तव्यपरायण रहायचे. सुईच्या अनुकुचीदार टोकावर अतिसंवेदनशील मनातून प्रतिभेचं फुल सर्वांगाने बहरून येते.हे लेखनाचे अत्यंत निराळेपण आहे असे मला मनस्वीपणे वाटते. लेखकाने जगण्याचा आनंद लुटला.त्यांनी भारतभर दौरा केला. काश्मीर ट्रीपला गेल्यानंतर किंवा अन्य कोणत्याही रमणीय स्थळाला भेट दिल्यानंतर तेथील निसर्ग लावण्याची नजाकत अलगद शब्द सामर्थ्यातुन कागदावर टिपली. निर्भय मनानी बिकट प्रसंगातून काढलेली आशावादी हिरवळीची वाट म्हणजे ''थोडंस कडू आणि फारच गोड ''हे पुस्तक आहे.या पुस्तकाचे आणखी एक विशेष ण म्हणजे त्यांनी कर्तृत्वावर ,डॉक्टरांनी केलेल्या उपचारावर विश्वास श्रद्धा ठेवली. आणि आजही ठेवतात.''त्याच समवेत शास्त्रीय उपचारांवर ठेवतात .या विचार धारेची अत्यंत गरज आहे .असे मला वाटते. देवाला आणि दैवाला दूषण देत नाहीत. कधी उद्विग्न,विमनस्क होत नाहीत.तर जीवनावरची आणि सत्यावरची अढळ आणि ठाम निष्ठा ठेवून जीवनातील सत्याला सामोरे जाणे व आजाराला समजून घेणे महत्वाचे असते. हे उधद्रुत केले आहे .भिऊन,आणि खुप भावनिक होऊन प्रश्नांची मालिका सुटत नाहीत,तर त्या प्रासंगिकतेच्या पातळीवर जाऊन ठाम भूमिका घेणे क्रमप्राप्त असते. माणसाचे संमिश्र ,सुष्ट,दुष्ट स्वरूप जे जाण वलेले आहे ते साहित्यकृतीतून व्यक्त करून साहित्यातून जीवनप्रणाली मांडली आहे.या लेखनाची भाषाशैली,सहज ,ओघवती आहे. अनुभवांचं लेणं आहे.त्यामुळे वास्तव परिघावरील रेखाटन आहे. समाजाभिमुख हा दृष्टिकोन आहे. यातून एक जीवनानुभव मांडण्याची पद्धत,वाचकाला मिळणारी आश्वासकता हे पुस्तकाचे कौशल्य ,निपुनता दिसून येते.सर्वांच्या संग्रही ही अशी साहित्यकलाकृती असावी.कारण हा साहित्यिक मूल्यांचा ठेवा नक्कीच जतन करून ठेवावा असा आहे.

सौ वंदना कुलकर्णी

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

# कळंबमध्ये फेक ई-चालान ॲपमुळे तरुणाची २ लाखांची ऑनलाइन फसवणूक

आरंभ मराठी | कळंब

वाहतूक नियम तोडल्याचा बनाव करून 'ई-चालान भरावा लागेल' असा बनावट मेसेज पाठवून फसवणूक करणाऱ्या टोळीने कळंब परिसरातील एका युवकाला आर्थिक फसवणुकीचा बळी बनवले आहे. निखिल अंधारे या तरुणाने फेक ई-चालान ॲप डाउनलोड केल्यानंतर त्याच्या एचडीएफसी बँक खात्यातून थेट २ लाख रुपये अज्ञात व्यक्तीच्या खात्यावर ट्रान्सफर झाल्याची घटना समोर आली. ही घटना बुधवारी (दि.२३) दुपारी १ च्या सुमारास घडली. निखिल यांना ''तुमच्यावर ट्रॅफिक चालान आहे, खालील लिंकवर क्लिक करून भरावे'' असा व्हाट्सएप मेसेज आला होता. त्यांनी दिलेल्या लिंकवरून 'ई-चालान ' ॲप डाउनलोड केले. ॲपने मोबाईलमधील एसएमएस, कॉल, स्क्रीन व बँकिंग ॲप्सवरील प्रवेश मागितला. ही परवानगी दिल्यानंतर काही मिनिटांतच त्यांच्या खात्यातून संपूर्ण रक्कम अज्ञात व्यक्तीच्या खात्यात ट्रान्सफर झाली. ही घटना संध्याकाळी लक्षात आल्यानंतर त्यांनी तातडीने सायबर सेलमध्ये तक्रार दाखल केली. सायबर पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.



फेक ई-चालान ॲपच्या माध्यमातून सायबर गुन्हेगार नागरिकांची लूट करत असून, याविरुद्ध अधिक जागरूकता व खबरदारीची गरज आहे. प्रशासन व पोलीस यंत्रणांनी सुद्धा यासंदर्भात जनजागृती मोहिमा राबवाव्यात. नागरिकांनी स्वतःच सतर्क राहून अशा प्रकरणात अडकू नये असे आवाहन करण्यात आले आहे.

## फसवणुकीची संपूर्ण पद्धत

एसएमएस किंवा व्हाट्सएप द्वारे ''ट्रॅफिक चालान भरावा लागेल'' असा मेसेज पाठवला जातो.लिंकवर क्लिक केल्यास फेक 'ई-चालान ॲप' डाउनलोड करण्यास सांगितले जाते.ॲप मोबाइलमध्ये एसएमएस स्क्रीन, कॉल, इंटरनेट व यूपीआय ॲक्सेसची परवानगी घेतो. ओटीपी
खाते नंबर, यूपीआय पिन यांची माहिती चोरली जाते.
खात्यातून काही वेळातच मोठी रक्कम काढली जाते.

## नागरिकांनी घ्यावयाची खबरदारी

कोणत्याही एसएमएस, व्हाट्सएप लिंकवर क्लिक करू नका.फक्त Google Play Store / App Storeवरूनच ॲप डाउनलोड करा.बँक किंवा UPI ॲप permissions काळजीपूर्वक तपासा. OTP, UPI PIN, पासवर्ड कुणालाही सांगू नका.चालान भरण्यासाठी अधिकृत वेबसाइटच वापरा.जवळच्या पोलीस ठाण्यात लगेच तक्रार दाखल करा.

# गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप



आरंभ मराठी | धाराशिव

मराठा मोफत वधुवर सूचक समितीच्या वतीने समता नगर येथील नगर परिषद शाळेत (क्र ११) गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या. तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक उमेश राजे निंबाळकर यांच्या हस्ते वह्या वाटप करण्यात आल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी प्रा.अभिमान हंगरगेकर व प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. दर्शन कोळगे, तानाजी जाधव, बिभीषण मोरे, दैनिक आरंभ मराठीचे संपादक चंद्रसेन देशमुख, महादेव तांबे यांची उपस्थिती होती. संयोजक प्रा. अभिमान हंगरगेकर, अशोक गायकवाड, गोरोबा लोंढे, सतीश पवार, संजय शिंदे, अमोल निंबाळकर, अशोक ठोंबळ, राजाभाऊ जगताप, कमलाकर मुंडे, अर्जुन जाधव, अनिताताई पाटील, स्वातीताई देशमुख, शाळेचे मुख्याध्यापक लावंड सर, शेंडगे सर व सर्व शिक्षक उपस्थित होते.

# पळसप येथील मुख्य रस्त्याची अवस्था असून अडचण आणि नसून खोळंबा



आरंभ मराठी | पळसप

तेर-पळसप- मुरूड मुख्य अरुंद रस्ता अनेक वर्षांपासूनची प्रवाशांची अडचण होती. या मुख्य रस्त्याने जाण्यासाठी प्रवाशी अनेक वेळा टाळाटाळ करत होते .मुरूड वरून धाराशिवला जाताना ढोकी मार्गे दूरवरून जाणाऱ्या रस्त्याला प्रवाशी पसंदी द्यायचे. मात्र, पळसप मार्गे धाराशिव जाणारा शॉर्टकट जवळील मार्ग जायला टाळाटाळ होत होती. त्याला कारणही तसेच होते. पळसप मुख्य चौकातील काही मीटर रस्ता अतिशय अरुंद होता. त्यातून चौकातील असणारी माणसांची आणि वाहनांची गर्दी त्यामुळे प्रवाशांना अनेकवेळा त्रास सहन करावा लागत असे. मात्र सद्या त्या ठिकानावरील अतिक्रमण काढून अनेक वर्षांनी या रस्त्याचे रुंदीकरण झाले. सात मीटरचा रस्ता झाला, परंतु आणखीही रस्त्यावर लावण्यात आलेल्या वाहनाच्या गर्दीमुळे पहिल्या सारखीच परिस्थिती निर्माण झाली आहे. एक वाहन जाताना त्या ठिकानावरून दुसऱ्या वाहनास जाणे कठीण बनले आहे. रस्त्यालगतच भर चौकात मोटार सायकल, ट्रॅक्टर, पाण्याचे टँकर, ऑटो इत्यादी वाहनांचीच सतत गर्दी पाहायला मिळते. अनेक वेळा यामुळे प्रवाशांना मार्ग काढणे कठीण बनते. त्यामूळे असून अडचण नसून खोळंबा असा प्रकार पाहायला मिळत आहे. यावर स्वतः ही वाहन चालक थोडा रस्ता सोडून बाजूला आपली वहाने लावत नाहीत किंवा यांच्यावर कोणाचे नियंत्रणही नाही अशी गत या मुख्य रस्त्याची झाली आहे. लाखो रुपये खर्चून हा रस्ता झाल्याचे बोलले जात आहे.

# राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या पाठपुराव्याला यश; मुरुममध्ये ३० जुलै रोजी पुन्हा महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

आरंभ मराठी | मुरुड

दिनांक १६ जुलै २०२५ रोजी मुरुम येथील रत्नमाला मंगल कार्यालयात घेण्यात आलेले ''छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर'' हे केवळ भाषणं आणि फोटोसेशनपुरते मर्यादित राहिल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होती. प्रत्यक्ष योजनांचा लाभ मिळवण्याच्या अपेक्षेने आलेल्या शेकडो नागरिकांची फसवणूक झाली. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने ठोस भूमिका घेत प्रशासनासमोर निवेदन सादर केले होते. या निवेदनावर बाबा कुरेशी (शहराध्यक्ष), इम्रान सय्यद (संघटक), लखन भोंडवे, श्रीधर इंगळे व पत्रकार मोहन जाधव यांच्या स्वाक्षऱ्या होत्या. नागरिकांचे प्रश्न, योजनांचा लाभ न मिळणे, आधार सीडिंग थांबवणे, अर्ज आणि फेरफाराच्या प्रक्रियेकडे दुर्लक्ष या सर्व मुद्द्यांवर जोरदार आवाज उठवण्यात आला होता. पक्षाच्या या मागणीमुळे प्रशासनाला तात्काळ




हालचाल करावी लागली आणि ३० जुलै रोजी पुन्हा एकदा 'महाराजस्व समाधान शिबिर' आयोजित करण्याचे आदेश तहसीलदारांनी काढले. या आदेशाची एक प्रत अधिकृतपणे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला देण्यात आली, यावरून पक्षाच्या मागणीला प्रशासनाने महत्त्व दिल्याचे स्पष्ट होते. या यशामागे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा आणि अधिकाऱ्यांशी केलेल्या तात्काळ पत्रव्यवहाराचा मोठा वाटा असून, यामुळेच शहरातील नागरिकांना पुन्हा एकदा योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळण्याची संधी उपलब्ध झाली आहे. ३० जुलै रोजी होणाऱ्या शिबिरात सर्व योजना प्रत्यक्ष अंमलात आणल्या जातील, तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी पुरेशा सुविधा असतील आणि अधिकारीही पूर्ण वेळ उपलब्ध असतील. पुन्हा एकदा शिबिराच्या आयोजन करणार असल्याने प्रशासन व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाबाबत नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.




## दैनिक आरंभ मराठीनेही दाखवला होता प्रशासनाचा भोंगळ कारभार

मुरुममध्ये १६ जुलै रोजी पार पडलेल्या महाराजस्व समाधान शिबिरात केवळ फोटोसेशन आणि भाषणापुरतीच कार्यवाही मर्यादित राहिल्याची बाब दैनिक आरंभ मराठीने ठळकपणे उजेडात आणली होती.या वृत्तामधून शिबिरातील अकार्यक्षमता, तांत्रिक अडचणी आणि नागरिकांच्या तक्रारींवर प्रशासनाचा दुर्लक्ष स्पष्टपणे समोर आणले होते.आरंभ मराठीने घेतलेली ही ठाम भूमिका हीच नागरिकांच्या भावना अधोरेखित करणारी ठरली.

# पवित्र श्रावण महिन्याला आजपासून सुरुवात, यंदा असणार चार श्रावणी सोमवार

आरंभ मराठी | मुरुम

श्रावण मासी हर्ष मानसी.... असे कवितेमध्ये केलेले श्रावणाचे वर्णन खरचं लोभसवाणे असते. या दिवसांत मस्त पाऊस पडतो आणि चहुबाजूनी धरती हिरवळीने नटलेली असते. अशा सुंदर आणि आल्हाददायक वातावरणाचा श्रावण सर्वांनाच हवाहवासा वाटतो. उत्तर भारतात श्रावण मास सुरू झाला आहे. उत्तर भारतातील पंचांग पद्धतीप्रमाणे पौर्णिमेनंतर महिना सुरू करण्याची प्राचीन परंपरा आहे. तर महाराष्ट्रासह लगतच्या राज्यांमध्ये आषाढ अमावास्येनंतर श्रावण मासाची सुरुवात होईल. श्रावण महिना पूर्वी 'नभस'या नावाने ओळखला जात असे. या



महिन्यात रात्रीच्या प्रारंभी पूर्वेला श्रवण नक्षत्र उगवते आणि रात्रभर आकाशात राहून पहाटे पश्चिमेस मावळते. तसेच श्रावण पौर्णिमेला चंद्र श्रवण नक्षत्रापाशी असतो. म्हणून या महिन्याला 'श्रावण' असे नाव मिळाले आहे. यंदा शुक्रवार, २५ जुलैपासून महाराष्ट्रात श्रावण महिना सुरू होत असून, शनिवार २३ ऑगस्टपर्यंत श्रावण महिना असेल.

## श्रावणातील प्रत्येक सोमवार ला महत्व

देवशयनी एकादशीला श्रीविष्णू योगनिद्रेत गेल्यानंतर सृष्टीचा सगळा कारभार, पालन यांची जबाबदारी महादेव शिवशंकर यांच्यावर असते, असे मानले जाते. त्यामुळे या काळात महादेवांची उपासना, नामस्मरण करण्यावर भर दिला जातो, असे म्हटले जाते. श्रावण हा महादेवांचे पूजन, नामस्मरण, उपासना करण्यासाठी सर्वोत्तम मानला गेला आहे. श्रावणातील प्रत्येक सोमवारला विशेष महत्त्व प्राप्त होते. श्रावणी सोमवारी महादेव शिवशंकरावर जलाभिषेक, दुग्धाभिषेक, रुद्राभिषेक मोठ्या प्रमाणावर केला जातो.

### व्रतांचा राजा अन् व्रते सण-उत्सवांची रेलचेल

श्रावणातील प्रत्येक दिवसाला वेगळे महत्त्व आहे. सप्ताहातील सातही दिवस वेगवेगळी व्रते आचरली जातात. पृथ्वीने नवीन गालीचा ओढण्याचा काळ म्हणजे श्रावण. नाविन्याची चाहूल म्हणजे श्रावण. श्रावणात आपल्या संस्कृती, परंपरा, सण उत्सव यांची अगदी रेलचेल असते. वातावरणात थंडावा आलेला असतो. जिथे पाहावे, तिथे धरणीमाता नवचैतन्याने न्हाऊन निघत असते. श्रावणातील व्रते वैयक्तिक मोक्ष साधनेचे मार्ग नाहीत.अतिशय तरलपणे काहीतरी शिकवण देणारी किंवा एकमेकांतील नाते संबंध जपणारी, ती वृद्धिंगत करणारी एक भावनिक; पण विशिष्ट नियमात जगणारी अमृत महिरप आहे.

### यंदा श्रावणी सोमवार किती आणि कधी?

१)पहिला श्रावणी सोमवार--२८ जुलै--
शिवामूठ--तांदूळ.
२)दुसरा श्रावणी सोमवार--०४ ऑगस्ट--
शिवामूठ--तिळ.
३)तिसरा श्रावणी सोमवार--११ ऑगस्ट--
शिवामूठ--मूग
४)चौथा श्रावणी सोमवार--१८ ऑगस्ट--
शिवामूठ--जव.

# दाळींब येथे ग्राम बाल संरक्षण समितीकडून अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण

आरंभ मराठी | दाळींब

उमरगा तालुक्यातील दाळींब येथील ग्रामपंचायत सभागृहात मंगळवारी (दि.२२) सकाळी ११ वाजता ग्राम बाल संरक्षण समिती सदस्यांचे एक दिवसीय प्रशिक्षण नुकतेच पार पडले. जिल्हा महिला बालविकास अधिकारी, जिल्हा बालसंरक्षण कक्ष यांच्याद्वारे हे क्षमता बांधणी प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणास ग्राम बाल संरक्षण समिती सदस्य, सचिव, अंगणवाडी सेविका सहभागी झाले होते. या कार्यशाळेत ग्राम बाल संरक्षण समितीची भुमिका, कर्तव्य व जबाबदारी, लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२, बालविवाह कायदा, बालकांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या यंत्रणा



महिला व बालविकास विभागाअंतर्गत बालकांसंबंधिच्या विविध योजना याबाबत माहिती देण्यात आली. यामध्ये मुरुम प्रकल्पांतर्गत येणाऱ्या एकुण ६ बिटमधील १६४ अंगणवाडी सेविका या एकदिवसीय प्रशिक्षणासाठी उपस्थित होत्या. यावेळी मुरुम प्रकल्पाचे बालविकास अधिकारी इंदुमती राठोड,येणेगुर बिटचे पर्यवेशिका ए,ए,कांबळे, कोमल धनवडे,जयश्री पाटील,अभय काळे यांनी उपस्थित सेविकांना मार्गदर्शन केले. यावेळी दाळींब येथील अंगणवाडी सेविका फरजाना शेख, रेश्मा चाकुरे , जयश्री ढंगापुरे,सुरेखा गायकवाड, सुमित्रा सुरवसे,फरहाद शेख, कविता पवार,शिला लोखंडे,विमल सुरवसे, शशिकला गुरव, सुनिता चव्हाण आदीसह बिटमधील अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

# राज्यव्यापी चक्का जामच्या पार्श्वभूमीवर उमरगा व येणेगूर-मुरुम मोड येथे आंदोलकांचा रास्ता रोको

## आंदोलनाला विविध पक्ष विविध पक्ष आणि संघटनांचा पाठिंबा

आरंभ मराठी | उमरगा

राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना करण्याच्या मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी (ता. २४ जुलै) रोजी राज्यभर 'चक्का जाम आंदोलन' करण्यात आले. या आंदोलनाची तीव्र झळ मराठवाड्यातही जाणवली. उमरगा शहर व येणेगूर-मुरुम मोड येथे शेकडो शेतकऱ्यांनी रस्त्यावर उतरत जोरदार आंदोलन केले. या आंदोलनाला प्रहार जनशक्ती पक्षाबरोबरच संभाजी ब्रिगेड, कॉंग्रेस, शिवसेना (उबाठा), वंचित बहुजन आघाडी, छावा संघटना आदी पक्ष-संघटनांनी पाठिंबा दर्शविला. विविध पक्षांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून मनोगते व्यक्त केली. येणेगूर-मुरुम मोड येथे झालेल्या चक्का जाम आंदोलनात उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी



यांनी स्वतः हजर राहून आंदोलनाला आपला सक्रिय पाठिंबा दर्शविला. यावेळी बोलताना आमदार स्वामी म्हणाले, ''शेतकऱ्यांना तात्काळ कर्जमाफी देण्यात यावी. सोयाबीन पिकाला प्रतिक्विंटल किमान ६ हजार रुपये हमीभाव मिळालाच पाहिजे. अन्यथा हे आंदोलन तीव्र स्वरूप धारण करेल.'' यावेळी उपस्थित प्रमुखांमध्ये प्रहार जनशक्ती पक्षाचे उमरगा तालुका अध्यक्ष अजीम खजुरे, शिवसेना (उबाठा) चे शेतकरी जिल्हाध्यक्ष विजयकुमार नागणे, शेतकरी तालुकाध्यक्ष विजय तळभोगे, येणेगूर ग्रामपंचायत सदस्य संतोष कलशेट्टी, प्रहार जनशक्तीचे लोहारा तालुका अध्यक्ष वामन ढोणे, जिल्हा उपाध्यक्ष दयानंद राठोड, उमरगा उपाध्यक्ष आनंद माने, प्रहार अपंग क्रांती आंदोलनचे तालुकाध्यक्ष अभय साळुंखे, भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे दिव्यांग जिल्हाध्यक्ष पंडित जळकोटे




यांचा समावेश होता. दरम्यान उमरगा शहरातील आंदोलनात संभाजी ब्रिगेडचे अण्णासाहेब पवार, छावाचे बाळासाहेब माने, कॉंग्रेसचे अर्जुन बिराजदार, विशाल काणेकर, दादासाहेब गायकवाड, विजय वाघमारे, वंचित आघाडीचे रामभाऊ गायकवाड, शिवसेना उबाठा गटाचे पदाधिकारीही सहभागी झाले होते. येणेगूर मोडवरील आंदोलनात सचिन खांडेकर, हुसेन मुल्ला, अक्रम माळवाले, मोहम्मद शेख, मोहम्मद आतार, जाफर मुल्ला, आसिफ शेख, आसिफ मुल्ला यांच्यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते. शिस्तबद्धपणे पार पडलेल्या या आंदोलनामुळे काही वेळ वाहतूक विस्कळीत झाली होती. मात्र, पोलिस प्रशासनाच्या दक्षतेमुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. शेतकऱ्यांचा हा जनआक्रोश सरकारने गांभीर्याने घ्यावा, अशी ठाम भावना सर्वच उपस्थितांनी व्यक्त केली.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक



आरंभ मराठी | उमरगा

मराठवाडा शिवसेना सचिव ॲड.अशोक पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हाप्रमुख मोहन पणूरे यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी (दि.२४) उमरगा व लोहारा तालुका शिवसेना पदाधिकारी यांची आगामी नगरपरिषद, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने बैठक पार पडली. या बैठकीत ॲड. अशोक पटवर्धन हे बोलत होते. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून शिवसैनिकांनी शासन राबवित असलेल्या विकासाच्या व लोकहिताच्या योजनांची माहिती घरा-घरापर्यंत पोहोचवण्याचे काम करत लोकांच्या समस्या सोडवत लोकांमध्ये चांगली प्रतिमा व संबंध निर्माण करावे, जेणेकरून येणाऱ्या सर्व निवडणुका आपल्यासाठी जिंकणे सोयीस्कर होईल असे सांगत पक्ष वाढीसंदर्भात सखोल मागदर्शन केले.या बैठकीस उपजिल्हाप्रमुख शब्बीर गवंडी, तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, लोहारा तालुकाप्रमुख जगन पाटील, शेतकरी सेनेचे विलास भगत, शेतकरी सेना उपजिल्हाप्रमुख बलभीम येवते, व्यंकट पाटील, बी.के.पवार, आप्पासाहेब पाटील, शेखर पाटील, दिपक जोमदे, राजेंद्र शिंदे, लोहारा परवेज तांबोळी, अनंत बायस, संदीपान बनकर, परमेश्वर साळुंखे, जितेंद्र सूर्यवंशी, मुरूम शहरप्रमुख सुरेश मंगरुळे, अभिमान खराडे,अमीन सुंबेकर, प्रमोद बंगले, ओम कोरे, आरीफ खानापुरे, दिपक रोडगे, विजय ढगे, आयुब शेख, श्रीकांत भरारे व संतोष सगर, प्रताप लोभे, हणमंत गुरव,विनोद मुसांडे, अरुण जगताप, नाना मदनसुरे, जितेंद्र कदम, दत्ता डोंगरे, सुरेश दंडगुले, विनोद इंगळे, नागेश गायकवाड, खय्युम चाकुरे, पतंग पवार आदी पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# तरुणाईचा सोशल स्फोट 'फॉलोअर्स' वाढले..पण आयुष्याचं काय?

## फेक प्रसिद्धीच्या नशेत हरवत चालली तरुणाई, गावागावात वाढतंय फेक स्टेटसचं आकर्षण


### शिक्षण, नोकरी, कौशल्य दुर्लक्षित; समाजात आर्थिक-सामाजिक तणाव वाढतोय

मोहन जाधव | आरंभ मराठी

मुरूम –महाराष्ट्रातील ग्रामीण भागांमध्ये सध्या एक गंभीर सामाजिक प्रवृत्ती वेगाने बळावत आहे. शिक्षण, कौशल्य, नोकरी यांसारख्या मूलभूत गोष्टींकडे पाठ फिरवत, तरुणाईचा मोठा वर्ग सोशल मीडियाच्या बनावट प्रसिद्धीच्या मोहात अडकत चालला आहे. फेसबुक, इंस्टाग्राम, यूट्यूबवरील लाईक्स, रील्स, व्हायरल व्हिडीओ यांद्वारे 'स्टार' बनण्याची झिंग इतकी प्रबळ झाली आहे की या नवतरुणांनी जीवनातील खरे उद्दिष्टच हरवले आहे. गावागावात अनेक तरुण दिवसभर मोबाईल मध्ये डोके खुपसून असतात. ''लाईक किती आले?'', ''कोण ट्रोल झालं?'', ''आज काय स्टोरी टाकायची?'' या प्रश्नांभोवती त्यांचं आयुष्य फिरू लागलं आहे. ''नेता'', ''सोशल वर्कर'', ''कार्यकर्ता'' अशी फेक ओळख तयार करून अनेक तरुण केवळ दिखाव्यापुरते समाजसेवक म्हणून स्वतःची प्रतिमा तयार करत आहेत.







या बनावट प्रसिद्धीच्या झगमगाटात शिक्षण, स्पर्धा परीक्षा, कौशल्यविकास, किंवा व्यवसायिक उभारणी या महत्त्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष होत आहे. मेहनत न करता झटपट प्रसिद्धी मिळवण्यासाठी केवळ मोबाईलवर अवलंबून असणारी ही तरुणाई हौशी जीवनशैलीसाठी उधारीवर खर्च करत आहे. दुचाकी, ब्रँडेड कपडे, मोबाईल, पार्टी यासाठी काही तरुण महागड्या कर्जात फसले आहेत. या बनावट जगाच्या आहारी गेलेल्या अनेक तरुणांनी उधारीवर पैसे घेऊन परतफेड न करता गावात वाद, भांडणं आणि सामाजिक तणाव निर्माण केला आहे. काही प्रकरणांमध्ये अत्याधिक व्याजाच्या सावकारी कर्जामुळे आत्महत्येच्या घटना देखील समोर येत आहेत. अशा तरुणाईला शेवटचा सवाल लाईक मिळाले, पण आयुष्य हरवलं नाही ना? तांत्रिक प्रगतीचा फायदा घ्यावा, पण तोच आयुष्याचा गाभा मानल्यास तरुण पिढीचं भविष्य धोक्यात येईल. याला थांबवण्यासाठी कुटुंब, समाज, शाळा आणि शासन यांनी एकत्रित जबाबदारी घेतली पाहिजे, ही काळाची गरज आहे.

### तरुणाई दिशाहीन होतेय

''तरुणाई दिशाहीन झाली आहे. गावात कार्यकर्ते म्हणून ओळख निर्माण करायची हौस आहे, पण सामाजिक भान कमी आहे. आम्ही युवकांसाठी सत्रं घेण्याचा विचार करतोय.''

**लखन भोंडवे**
सामाजिक कार्यकर्ते, मुरुम

### तरुणांना मेहनत न करता यश हवं आहे

''कामासाठी मुलं हवी असतात, पण अनेक तरुण काम करण्याऐवजी फक्त सोशल मीडियावरच सक्रिय असतात. मेहनत न करता यश मिळेल असं त्यांना वाटतं.''

**सूर्यकांत सूर्ये**
उद्योजक, मुरुम

### तरुणाईला दिशा देणं गरजेच

ग्रामस्तरावर कौशल्यविकास आणि रोजगार शिबिरं आयोजित व्हावीत, करिअर मार्गदर्शन सत्रे नियमित घ्यावीत, पालकांनी मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद वाढवावा, शाळा व महाविद्यालयांनी सायबर माध्यमांचे भान निर्माण करावे, सामाजिक संस्थांनी सुधारणा मोहिमा राबवाव्यात.

# अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या पश्चिम महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षपदी प्रतिभा मगर यांची निवड




पुणे– साहित्य क्षेत्रातील अग्रणी असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या पश्चिम महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्ष पदी सुप्रसिद्ध कवयित्री प्रतिभा मगर यांची निवड करण्यात आली आहे त्यांच्या निवडीचे पत्र अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.शरद गोरे यांनी देऊन हि अधिकृत घोषणा केली आहे,सौ.मगर ह्या गेली २५ वर्षे साहित्य क्षेत्रात कार्यरत असून स्टार्च हवंय विचारांना,उन्हाळी वाटा हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित आहेत, विविध पुरस्कारांने त्यांचा सन्मान झाला आहे,अनेक साहित्य संमेलनात मान्यवर म्हणून त्यांनी सहभाग नोंदवला आहे, महिला साहित्याच्या क्रेंद्रस्थानी आणण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याची भावना या वेळी प्रतिभा मगर यांनीव्यक्तकेली.

# ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने माडज येथे नेत्ररोग शिबीर

आरंभ मराठी | माडज

उमरगा तालुक्यातील माडज येथे ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था उमरगा यांच्या वतीने आकांक्षाताई चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्ररोग शिबीर घेण्यात आले. याचा लाभ परिसरात नागरिकांनी घेतला. याप्रसंगी माडज ग्रामपंचायत च्या वतीने आलेल्या सर्व डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ, तेजस ढोबळे, डॉ. शशिकांत विचारे यांनी तपासणी केली. यावेळी माडज गावच्या आशा कार्यकर्त्यांनी त्यांना मदत केली. यावेळी डोळ्याची तपासणी करून



असलेल्या मोतीबिंदू किंवा इतर रोगांची त्यांना माहिती देऊन ऑपरेशन देखील ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याचे संयोजक आकांक्षाताई चौगुले यांनी सांगितले.

# जकेकुर शाळेतील मुख्याध्यापक संजय चालुक्य यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सपत्नीक यथोचित सत्कार

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा तालुक्यातील जकेकुर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक संजय लक्ष्मणराव चालुक्य यांचा सेवानिवृत्ती निमित्त मान्यवरांनी सपत्नीक सत्कार बुधवारी (दि.२३) करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्तविक शाळेतील पदवीधर शिक्षक कृष्णा माळी यांनी कार्यक्रमाचे विशेष सत्कारमूर्ती सेवानिवृत्त संजय चालुक्य आणि त्यांचे सुवैद्य पत्नी सुनिता संजय चालुक्य यांच्या कुटुंबियांना भावी आयुष्यासाठी आरोग्यमय शुभेच्छा देवून शैक्षणिक सेवेतील उल्लेखनीय कार्याबद्दल अल्पसा परिचय केले. यावेळी उमरगा–लोहारा तालुक्याचे आमदार प्रविण स्वामी, जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती तथा भाजपा नेते अभयराजे चालुक्य, उमरगा श्री. छत्रपती शिक्षण संस्थेचे सचिव शहाजीभैय्या पाटील, जकेकुरचे सरपंच अनिलभैय्या बिराजदार, माजी उपसरपंच तानाजी पाटील, सोलापूर



जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त मुख्य अभियंता देविदास दाडगे, उमरगा प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे, जेष्ठ समाजसेवक शिवाजीअण्णा चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सेवापूर्ती सोहळ्यानिमित्त मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक सत्कार केला. सेवापूर्ती सोहळा कार्यक्रमास जकेकुर, मुळज, उमरगा परीसरातील जेष्ठ समाजप्रेमी शिक्षणप्रेमी बांधव, मित्र मंडळी, राजकीय, शैक्षणिक, व्यवसायीक, सामाजिक,संघटनात्मक क्षेत्रातील मान्यवर, महिला भगिंनी, लहान–थोर मंडळी, जकेकुर ज्ञानप्रबोधिनी विद्यालयाचे सर्व शिक्षक वृंद, विद्यार्थी, अंगणवाडी ताई आणि मदतनीस आणि जकेकुर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे विद्यार्थी, धाराशिव व लातूर जिल्ह्यातील स्नेही, नातेवाईक आदिची बहुसंख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परमेश्वर साखरे आणि आभार प्रदर्शन मोहन सालेगावकर यांनी केले.

# साऊ एकल महिला पूर्नवसन समितीचा समाजाला दिशा देणारा उपक्रम

## एकल महिलांच्या हस्ते दीप प्रज्वलन व मान्यवरांचे स्वागत;५७ विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत

आरंभ मराठी | उमरगा

परंपरेच्या पलीकडे जात समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न करत साऊ एकल महिला पुनर्वसन समितीच्या वतीने उमरगा–लोहारा तालुक्यातील एकल महिलांच्या ५७ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम बुधवारी (दि. २३ जुलै) रोजी छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवर आणि उपस्थित एकल महिलांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. विशेष म्हणजे मान्यवर पाहुण्यांचा सत्कारही एकल महिलांच्या हस्तेच पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटक भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रवीण स्वामी, नायब तहसीलदार अमित भारी, डॉ. प्रतापराव देशमुख, प्राचार्य संजय अस्वले, तहसीलदार गोविंद येरमे, संजय सरपे आदींची उपस्थिती लाभली. प्रास्ताविक करताना समितीचे जिल्हा समन्वयक विजय जाधव यांनी सांगितले, ''समाजामध्ये पती गमावलेल्या महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आजही पूर्वग्रहदूषित आहे. या पार्श्वभूमीवर त्यांचा सन्मान राखत, त्यांनी घडवलेल्या



विद्यार्थ्यांना शैक्षणिक दृष्टीने बळकटी देण्यासाठी समितीने हा उपक्रम घेतला आहे.'' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार वह्या, दप्तर, गणवेश, स्टेशनरी आदी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. सुमारे ८०,००० रुपयांचा खर्च यासाठी आला असून, त्यापैकी ५०% निधी साऊ समितीचे राज्य नियंत्रक हेरंब कुलकर्णी यांनी स्वखर्चातून उभारला. उर्वरित खर्चासाठी तहसीलदार गोविंद येरमे, प्राचार्य संजय अस्वले, माजी उपविभागीय जलसंधारण अधिकारी संजय सरपे यांनी मदतीचे आश्वासन दिले आहे. तर कार्यक्रमात अनेक एकल महिलांनी आपल्या व्यथा व्यक्त करत, सामाजिक अपमान सहन करत असतानाही मुलांचे शिक्षण थांबवले नाही, असे सांगितले. त्या पार्श्वभूमीवर समितीने विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार वस्तू देऊन त्यांना शैक्षणिक प्रवाहात ठेवण्याचा प्रयत्न केला.यावेळी सध्या लोकसभा सदस्य असलेले माजी खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी देखील समितीच्या कार्याला सातत्याने पाठिंबा दिला असून, गरज भासल्यास भक्कमपणे पाठीशी राहण्याचे आश्वासन दिले असल्याचे सांगण्यात आले. तहसीलदार गोविंद येरमे यांनी सांगितले की, ''महसूल खात्याच्या विविध योजनांमध्ये नियमांनुसार पात्र लाभार्थींना मदत मंजूर केली जाईल.'' प्राचार्य संजय अस्वले यांनी पालकांना उद्देशून सांगितले की, आपल्या पाल्यांनी नियमित कॉलेजमध्ये हजेरी लावणे अत्यावश्यक आहे. गुणवत्तेची पडताळणी करण्यासाठी पालक मेळाव्यात सहभागी व्हावे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पी. डी. पाटील यांनी तर आभार प्रदर्शन ज्योती राजपूत यांनी केले. यावेळी तालुकाध्यक्ष काशिनाथ पाटील, समिती सदस्य ज्योती माने, हरी माडजे, शंभूलिंग स्वामी, स्मिता चव्हाण, वर्षा स्वामी, ज्योती पुरकर, गौरी पंडित, कविता साळी आणि 'कोवोड ग्रुप'चे सदस्य यांची उपस्थिती लक्षणीय ठरली.

# मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत गोंधळ; वर्क ऑर्डर नंतरही पंप मिळेना, शेतकऱ्यांची फसवणूक

## तक्रार निवारण कक्षाची तात्काळ नेमणुक करण्याची शिवसेना शेतकरी सेनेची मागणी

आरंभ मराठी | तुळजापूर

राज्य शासनाच्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेतून राज्यातील हजारो शेतकऱ्यांना सौर पंप उपलब्ध करून देण्याचा उद्देश होता. मात्र, प्रत्यक्षात या योजनेत अनेक तांत्रिक अडचणी व अंमलबजावणीत दिरंगाई समोर येत असल्याने शेतकरी वर्ग त्रस्त झाला आहे. याच पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यातून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देत तक्रार निवारणासाठी प्रत्येक तालुक्यात विशेष कक्ष स्थापन करण्याची मागणी शिवसेना शेतकरी सेनेचे तालुकाध्यक्ष गणेश नेपते यांच्या वतीने करण्यात आली आहे. शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज करून, शुल्क भरून वेंडर निवड केली. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी संबंधित शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन पाहणीही पूर्ण केली आणि त्यानंतर निवडलेल्या कंपनीमार्फत वर्क ऑर्डर जारी करण्यात आल्या. वर्क ऑर्डरमध्ये स्पष्टपणे ६० दिवसांच्या आत पंप बसवून देण्याचा उल्लेख आहे. मात्र, प्रत्यक्षात ५ ते ६ महिने उलटूनही पंपाचे काम पूर्ण झालेले नाही.यामुळे अनेक शेतकरी कंपनीच्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधत आहेत, पण समाधानकारक उत्तर मिळत नाही. काही शेतकऱ्यांना तर कंपनीच्या प्रतिनिधींनी सांगितले की, ''तुमचे साहित्य धाराशिवजवळील गोडाऊनमध्ये आहे, स्वतःच्या वाहनाने घेऊन जा.' त्यामुळे शेतकरी ४–५ हजार रुपये खर्चून अर्धवट साहित्य घरी घेऊन आले आहेत. पण उर्वरित साहित्य व प्रत्यक्ष पंप बसवण्याचा काही ठावठिकाणा नाही.या सगळ्या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम व नाराजी वाढली आहे. ''शासनाने आमच्याकडून पैसे घेऊन फक्त वर्क ऑर्डर दिली आणि आता आमची फसवणूक होत आहे,'' अशी भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. निवेदनात कंपन्यांनी केलेल्या अपूर्ण कामांची तत्काळ चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी, प्रत्येक तालुक्यातील महावितरण कार्यालयात सौर कृषी पंप योजना तक्रार निवारण कक्ष अथवा प्रतिनिधी नेमावा आणि शेतकऱ्यांच्या तक्रारींसाठी थेट संपर्काचे माध्यम आणि ठोस उत्तरदायित्व असावे या मागण्या करण्यात आल्या आहेत.ही योजना शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरू शकते, मात्र सध्याची योजनेची अंमलबजावणी बघता ही योजना अडचणीचे कारण ठरत आहे. शासनाने यामध्ये तत्काळ लक्ष घालून संबंधित कंपन्यांना व महावितरण अधिकाऱ्यांना उत्तरदायी धरून शेतकऱ्यांचा विश्वास पुन्हा मिळवण्याची गरज आहे. प्रशासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावे अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा शिवसैनिकांनी दिला आहे.

# जळकोट येथील अंगणवाड्यांमध्ये फळे व बिस्किटांचे वाटप



आरंभ मराठी | जळकोट

संत गाडगेबाबा सेवाभावी संस्थेचे सचिव लक्ष्मण माडडोळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, संस्थेच्या वतीने जळकोट गावातील सर्व अंगणवाड्यांमधील बालकांना फळे व बिस्किटांचे वाटप करण्यात आले. संस्थेच्या सेवाभावी परंपरेतूनच प्रेरणा घेत, सचिव मडोळे यांनी वाढदिवसानिमित्त कोणतीही जाहिरातबाजी न करता समाजोपयोगी उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या संकल्पनेतूनच संपूर्ण जळकोट गावातील अंगणवाड्यांतील लहानग्यांना पोषणदृष्ट्या उपयुक्त फळे व बिस्किटे वाटण्यात आली. या उपक्रमामुळे सुमारे १५० हून अधिक बालकांना थेट लाभ झाला. या उपक्रमात संस्थेचे पदाधिकारी, ग्रामस्थ, अंगणवाडी सेविका, पालक व स्वयंसेवक यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. ''गाडगेबाबांच्या शिकवणुकीनुसार सेवा आणि स्वच्छतेसोबतच समाजातील दुर्लक्षित घटकांपर्यंत प्रेमाने पोहोचणे हे आमचे ध्येय आहे,'' असे मत सचिव लक्ष्मण मडोळे यांनी यावेळी व्यक्त केले. संस्थेच्या वतीने अशाच प्रकारचे सामाजिक उपक्रम पुढेही सातत्याने राबवले जातील, असा निर्धार या निमित्ताने करण्यात आला.

# बोरगाव काळे येथे कर्जमाफीसाठी चक्का जाम आंदोलन

आरंभ मराठी | मुरुड

लातूर जिल्ह्यातील मुरुड–लातूर मुख्य मार्गावरील बोरगाव काळे येथे गुरुवारी (दि.२४) शेतकऱ्यांनी कर्जमाफीच्या मागणीसाठी तीव्र चक्का जाम आंदोलन केले. राज्याचे माजी मंत्री बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत विविध शेतकरी संघटनांनी रस्त्यावर उतरून आपला संताप व्यक्त केला. या आंदोलनामुळे सुमारे एक तास वाहतूक पूर्णतः ठप्प झाली होती. शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज तात्काळ माफ करावे, बच्चू कडू यांच्या आंदोलनातील मागण्या सरकारने मान्य कराव्यात, शेतीमालाला हमीभाव लागू करावा इत्यादी मागण्यासाठी संघटना, शेतकरी, दिव्यांग बांधवांनी घोषणाबाजी करत रस्त्यावर ठिय्या दिला होता.या आंदोलनात



स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष धर्मराज पाटील, तालुका अध्यक्ष बालाजी शिंदे, उपाध्यक्ष महारुद्र चौंडे, करण साखरे, स्वराज्य पक्षाचे जिल्हा सचिव समाधान शिंदे, कार्याध्यक्ष खंडू पवार, जिल्हाध्यक्ष दादासाहेब काळे, विधी आघाडी प्रदेशाध्यक्ष विजयकुमार जाधव, शिवसेना (उबाठा) गटाचे कैलास पाटील, प्रहार संघटना शाखाध्यक्ष खंडू आवटे, गणेश शिंदे, निळकंठ काळे, महादेव काळे, संदिपान फोलाने, माजी चेअरमन दीपक काळे,चेअरमन सतीश काळे, पवन देशमुख,चेअरमन संघटनेचे अध्यक्ष वीरसेन भोसले,रमाकांत मोरे,शेतकरी, दिव्याग बांधव यांची उपस्थिती होती. आंदोलनस्थळी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# संपूर्ण कर्जमाफीसाठी प्रहार संघटनेचा एल्गार, रास्ता रोको आंदोलनातून सरकारला इशारा

आरंभ मराठी | लोहारा

सोलापूर–हेंद्राबाद मार्गावरील मुरूम मोड फाट्यावर रास्ता रोको आंदोलना दरम्यान शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी देऊन स्वामिनाथन आयोगाची शिफारस लागू करा, शेतकऱ्यांच्या मालाला हमी भाव द्या, दिव्यांगाना ६००० वेतन द्या, यासह इतर मागण्यांसाठी गुरुवारी (दि.२४) धाराशिव जिल्ह्यातील मुरूम मोड येथे प्रहार दिव्यांग, प्रहार जनशक्ती पक्ष, उबाठा, व इतर शेतकरी संघटनेच्या वतीने, रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.या आंदोलनामुळे अनेक महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प पडली होती. या वेळी महामार्गाच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. या आंदोलनाचा सर्वाधिक फटका प्रवाशांना बसला. मुरूम मोड येथे प्रहार संघटनेचा रास्ता रोको करण्यात आला. शेतकऱ्यांच्या विविध न्याय मागण्यांसाठी गुरुवारी सकाळी ९ वाजता स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने सोलापूर हेंद्राबाद मार्गावरील मुरूम फाट्यावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात हजारो शेतकरी, दिव्यांग सहभागी झाले होते. काही



वर्षांपासून राज्यातील शेतकरी अस्मानी सुलतानी संकटाचा सामना करत आहेत. यंदा निसर्गासोबत शासनानेही शेतकऱ्यांची हेळसांड चालवली आहे. शेत मालाला हमी भाव मिळत नसल्याने जिल्ह्यातील शेतकरी दिवसागणिक आत्महत्या करत आहेत. त्यामुळे जोपर्यंत शेतकऱ्यांचा सातबारा कोरा होत नाही तसेच स्वामिनाथन आयोगाची शिफारस लागू करण्यात येत नाही, तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही. या मागण्या मान्य न झाल्यास उग्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला. आंदोलनात कार्यकर्त्यासह असंख्य शेतकरी सहभागी झाले होते. प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या आदेशान्वये फसव्या कर्ज माफी विरोधात एल्गार पुकारण्यात आला. प्रहारचे प्रणेते आमदार बच्चू कडू यांच्या आदेशावरून हे आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात उमरगा, लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी उमरगा तहसीलदार मार्फत शासनास निवेदन देण्यात आले. या वेळी कार्यकर्त्यांनी शासन विरोधी घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला. रास्ता रोको आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. या वेळी आंदोलकांनी शासनविरोधात घोषणाबाजी केली. यांच्यासह तालुक्यातील शेतकरी ,दिव्यांग मोठ्या संख्येने सहभागी होते.

# पाडोळी येथील ६ मेगावॅट सौर प्रकल्पाचे उद्घाटन

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव, शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने सुरू झालेली मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० अन्य राज्यांसाठी मार्गदर्शक ठरली आहे. जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांद्वारे पुढील एक वर्षात १६ हजार मेगावॅट विजेचा शेतीला दिवसा पुरवठा करण्यात येणार आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी बुधवारी (दि.२३) दिली. पाडोळी (ता. कळंब) येथे क्लिनहेडेज न्यू एनर्जीज प्रा. लि. आणि आदित्य ग्रीन एनर्जी विकासकांच्या सहाय्याने पूर्ण झालेल्या ६ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन श्री. लोकेश चंद्र यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने, संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार,



संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे व धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजनेला राज्यात सर्व जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने मोठा वेग मिळाला आहे. या योजनेचा अभ्यास व अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाच्या सूचनेनुसार उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, राज्यस्थान या राज्यांतील लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी येत आहेत. लातूर व धाराशिव जिल्हे मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० मध्ये अग्रेसर आहे. लातूर जिल्ह्यात २२५ मेगावॅट क्षमतेचे ४६ व धाराशिव जिल्ह्यात २८ क्षमतेचे ८ सौर प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. या दोन्ही जिल्ह्यातील ७२ हजार शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा उपलब्ध झाला आहे. पाडोळी येथील ६ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पातून पाडोळी उपकेंद्र अंतर्गत पाडोळी, नायगाव, निपाणी, वडगाव, वाठवडा व पिंपरी या गावातील २१०६ शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा होणार आहे. कार्यक्रमाला अधीक्षक अभियंता सर्वश्री संजय आडे (धाराशिव), प्रशांत दाणी (लातूर), प्रेम सिंग राजपूत (बीड) यांची उपस्थिती होती.